**State Council of Educational Research & Training, Maharashtra**
708, Kumthekar Road, Pune 30.
Tel. (020) 2447 6938
Email ID – dir.mscert@gmail.com

**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र**
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर रोड, पुणे ३०
दुरध्वनी क्र. २४४७ ६९३८,२४४७५५७१
इमेल आयडी - dir.mscert@gmail.com

जा.क्र.राशैसंवप्रप/पुणे/लेखा/टीडीएस/२०२०/१५६८ दिनांक १८/०८/२०२०. 08/08/2020

**विषय :- वस्तू व सेवा कर (जीएसटी) व आयकर कपातीचे रिटर्न ऑनलाईन विवरणपत्रे भरणेकरिता दरपत्रक मागवीणेबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे ३० या कार्यालयामधील अधिकारी आणि कर्मचारी यांच्या वेतनामधून प्रतिमाह कपात करण्यात येणारा आयकर व कंत्राटदार-पुरवठादार यांच्या देयकामधून कपात करण्यात आलेला उगमकर/आयकर त्याचप्रमाणे या कार्यालयास वस्तू पुरविणा-या कंत्राटदार/पुरवठादार यांच्या देयकामधून कपात करण्यात आलेल्या वस्तू व सेवा कर यांची नियतकालिक विवरणपत्रे भरणेकरिता आर्थिक वर्ष २०२०-२१ साठी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून दोन लिफाफा पध्दतीने सीलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

१. दरपत्रक भरताना त्यामध्ये या पत्राचा संदर्भ क्रमांक व दिनांकाचा अचूक उल्लेख करावा.

२. दरपत्रकातील दर अक्षरी व अंकी नमूद करावेत.

३. प्रति तिमाही साधारणपणे नमुना-२४ क्यु च्या त्रैमासिक सरासरी ८० ते १०० नोंदी व नमुना २६ क्यु च्या सरासरी ३० ते ३५ नोंदी असतात. नमुना २४ क्यु व २६ क्यु आणि आणि १६ अ, इ-टीडीएस रिटर्न चे दर त्रैमासिक (क्वार्टरली) भरण्यात यावेत. यामध्ये इतर अनुषंगिक खर्चाचा देखील समावेश असेल. उदा. एनएसडीएल कडे शुल्कापोटी भरावी लागणारी रक्कम किंवा प्रथम भरलेल्या विवरणपत्रातील तांत्रिक दोषामुळे पुन्हा सुधारित विवरणपत्रे भरावे लागल्यास त्याचा खर्च इत्यादी.

४. नमुना २४ क्यु, २६ क्यु यांचे तिमाही विवरणपत्र आयकर आणि वस्तू व सेवाकर विभागास सादर झाल्यानंतर प्रत्येक कंत्राटदार/पुरवठादार निहाय ऑनलाईन नमुना १६ अ तयार करुन द्यावयाचा आहे. आर्थिक वर्षाचे शेवटचे नमुने २४ क्यु व वार्षिक विवरणपत्र भरल्यानंतर नमुना २७ ए आणि प्रत्येक आयकर आणि वस्तू व सेवा कर भरणा करणा-या अधिकारी व कर्मचारी यांचे नमुना १६ मधील वार्षिक विवरणपत्र ऑनलाईन करुन द्यावयाचे आहे. तसेच प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांचा वार्षिक १६ ए फॉर्म हा दोन प्रतींमध्ये या कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.

५. या दरामध्ये विवरणपत्राचे अनुषंगाने भरावयाच्या सर्व अनुषंगिक नमुन्यां (फॉर्म) चा समावेश असेल. वेळोवेळी अतिरिक्त रक्कम देय होणार नाही.

६. विवरणपत्र भरतांना कार्यालयाकडून पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये काही त्रूटी, कमतरता अथवा चुका आढळून आल्यास त्याची तात्काळ माहिती कार्यालयास देऊन त्याचे निराकरण करुन घेऊन बिनचुक विवरणपत्र दाखल करण्याची जबाबदारी आपली असेल.

७. विवरणत्र अंतिमतः आयकर आणि वस्तू व सेवा कर विभागास सादर झाल्यानंतर त्यामध्ये आयकर आणि व वस्तू व सेवा कर विभागाने काही त्रूटी-उणिवा निदर्शनास आणून दिल्यास त्याचे आयकर आणि वस्तू व सेवा कर विभागाने विहित केलेल्या मुदतीत विना विलंब निराकरण करुन द्यावे लागेल. त्याकरिता काही माहिती या कार्यालयाकडून आवश्यक असल्यास ती वेळेत पुरविण्यात येईल. मात्र त्याकरीता वेळेतच पूर्वसूचना या कार्यालयास द्याव्या लागेल. केवळ तांत्रिक उणिवा किंवा दोष यामुळे दुरुस्ती विवरणपत्र (करेक्शन इ-रिटर्न) भरावे लागल्यास त्याकरिता वेगळी रक्कम आकारता येणार नाही. आयकर कपातीमध्ये शॉर्ट डिडक्शन /अती

वसूली असल्यास त्याचे दुरुस्त रिटर्न फाईल करुन द्यावे लागेल त्याकरीता कोणतेही वेगळे शुल्क कार्यालयामार्फत अदा करण्यात येणार नाही. दूरुस्ती विवरणपत्र भरण्याचे अनुषंगाने (नॅशनल सिक्यूरिटीज डिपॉझीटी लिमिटेड) यांना भरावी लागणारी शुल्क रक्कम मात्र देय राहील.

८. आयकर हकपातीकरिता तिमाही विवरणपत्राप्रमाणेच वार्षिक विवरणपत्र भरुन द्यावे लागेल. त्याकरिता येणा-या वरील बाब क्र. ५ व ७ मध्ये नमुद केल्याप्रमाणे दर देय राहील. त्याचप्रमाणे अधिकारी व कर्मचारीनिहाय तयार कराव्या लागणा-या वार्षिक नमुना १६ करिता वेगळा आकार देय राहणार नाही.

९. विवरणपत्र भरण्याकरिता लागणारी विहित नमुन्यातील आवश्यक ती प्राथमिक माहिती (हार्ड कॉपी आणि सॉफ्ट कॉपी) आपणास कार्यालयाकडून पुरविण्यात येईल. त्यानंतर आयकर विभागास विवरणपत्र भरल्यानंतर त्याबाबतचे (प्रोव्हीजनल ऑर फायनल सर्टिफिकेट) या कार्यालयास सादर करावे लागेल. त्यानंतरच संबंधित तिमाहीचे देयक प्रदान करण्यात येईल.

१०. प्रत्येक देयकातून नियमानूसार उद्‌गम करआणि वस्तू व सेवा कर (जीएसटी) आणि कर विहित दराने कपात करण्यात येईल. ११. मान्य दरपत्रक धारकाने त्यांचेकडे सोपविलेल्या कामाबाबतचे रुपये १००/- सर्वसाधारण मुद्रांक पेपरवर करारपत्र (परफॉरमन्स गॅरंटी बॉड) करुन द्यावयाचे आहेत.

१२. मान्य दर एक वर्षाकरिता ग्राहय राहतील. दरम्यानच्या काळात दरवाढ मागता येणार नाही.

वरील अटी व शर्ती विचारात घेऊन सोबत जोडलेल्या नमुन्यात आपल्या लेटरहेडवर दरपत्रक भरावे. पाकीटावर ई-टीडीएस रिटर्न करिता दरपत्रक असे ठळक अक्षरात नमूद करुन ही जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून कार्यालयीन ८ दिवसाचे आत समक्ष अथवा टपालाद्वारे दरपत्रक सादर करावे. या कार्यालयास विलंबाने प्राप्त झालेल्या तसेच अपूर्ण दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

बयाणा रक्कम रुपये 5,000/-ही डिमांड ड्रॉफ्ट स्वरुपात या कार्यालयाच्या आहरण व संवितरण अधिकारी यांचे बँक खाते क्रमांक १११५३६७०९७८, आयएफएससी कोड क्र. एसबीआयएन०००००४५५ या खात्यावर "Accounts Officer, State Council for Educational Research And Training, Maharashtra" या नावे डीमांड ड्राफट काढण्यात येऊन दरपत्रकासोबत जमा करावा. दरपत्रकासोबत सादर केलेल्या सर्व कागदपत्रांवर संस्थेचा शिक्का व प्राधिकृत सही असणे आवश्यक आहे. केवळ तांत्रिक दृष्टया पात्र दरपत्रकाचाच आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच निवड न झालेल्या दरपत्रकधारकाची बयाणा रक्कम/डीमांड ड्राफट प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर परत करण्यात येईल.

उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०१/१२/२०१६ मधील नियम ३.२.३ पृष्ठ क्रमांक ४४ अन्वये विविदाकाराचा पॅन कार्ड व व्हॅट/सीएसटी क्रमांक असलेल्या (व्हॅट/सीएसटी) क्रमांक लागू नसल्यास तत्सम प्राधिकरणाकडी नोंदणी क्रमांक असलेल्या लेटरहेडवर दरपत्रक सादर करावे.

सोबत:- दरपत्रक नमुना

(दिनकर पाटील)
संचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण
परिषद, महाराष्ट्र पुणे ३०.

# तांत्रिक दरपत्रक अर्ज नमुना

| | | |
|---|---|---|
| १. | दरपत्रक क्रमांक | अंतिम दिनांक |
| २. | दरपत्रक सादर करणा-या सेवा पुरवठादार कंपनी फर्म चे नाव व संपूर्ण पत्ता भरणा-या फर्म/कंपनी/संस्थेचे नाव व सविस्तर पत्ता | :- ------------------------------------------------<br>:- ------------------------------------------------<br>:- ------------------------------------------------<br>------------------------------------------------ |
| ३. | दरपत्रक स्वाक्षरीत करणा-या व्यक्तीचे नाव व पद/हुद्दा | :- ------------------------------------------------<br>:- ------------------------------------------------ |
| ४. | मोबाईल /दुरध्वनी क्रमांक | :------------------------------------------------ |
| ५. | सुरक्षा अनामत रक्कम तपशिल (डी.डी.) | :------------------------------------------------ |
| ६. | पॅन नंबर नमूद करावा व छायांकित प्रत सोबत जोडावी. | :------------------------------------------------ |
| ७. | आयसीएआर सीए फर्म रजिस्ट्रेशन नंबर व रजिस्ट्रेशन झेरॉक्स | :------------------------------------------------ |
| ८. | सीएसटी/वॅट नोंदणी प्रमाणपत्र क्र. व छायांकित प्रत | :------------------------------------------------ |
| ९. | मागील दोन वर्षाचे आयकर व जीएसटी रिटर्न फाईल केल्याचा पुरावा | :------------------------------------------------ |
| १०. | कंपनी प्रमाणपत्र | :------------------------------------------------ |
| ११. | मागील दोन आर्थिक वर्षाचे (सन २०१८-१९ व सन २०१९-२०) आर्थिक ताळेबंद व नफा तोटा पत्रक | :------------------------------------------------ |
| १२. | मागील दोन वर्षात इतर शासकीय, निम-शासकीय कार्यालयांना सेवा पुरवठा केला असल्यास संबंधित अनुभवाचे दाखल्याच्या छायांकीत प्रती | :------------------------------------------------ |
| १३. | अटी व शर्ती मान्य असल्याचे विधान | :------------------------------------------------ |
| १४. | काळया यादीमध्ये समाविष्ट नसल्याचे हमीपत्र | |
| १५. | सदर संस्थेमध्ये कार्यरत कोणाशीही वैयक्तिक, आर्थिक हितसंबंध नसल्याचे हमीपत्र | :------------------------------------------------ |
| १६. | कार्यालयीन माहितीचे गोपनियतेचा भंग न करण्याबाबतचे हमीपत्र | :------------------------------------------------ |
| १७. | डिमांड ड्राफट तपशिलासह | :- |

ठिकाण :- दरपत्रक सादर करणा-याची स्वाक्षरी

दिनांक :- संपूर्ण नाव ------------------------

## *लिफाफा क्र. २ आर्थिक*

| | | |
|---|---|---|
| १. | दरपत्रक भरणा-या फर्म/कंपनी/संस्थेचे नाव व सविस्तर पत्ता | :- ------------------------------------------------ ------------------------------------------------ |
| २ | दूरध्वनी क्रमांक | :------------------------------------------------ |
| ३ | इ-मेल पत्ता | :- ------------------------------------------------ |
| ४ | भ्रमणध्वनी क्रमांक | :- ------------------------------------------------ |

| कामाचा प्रकार | एकक | दर (रुपये अंकी व अक्षरी) |
|---|---|---|
| नमुना २४ क्यु | त्रैमासिक | |
| नमुना २६ क्यु | त्रैमासिक | |
| नमुना २४ क्यु च्या अनुषंगाने अधिकारी आणि कर्मचा-यांचे वार्षिक नमुना १६ मधील आयकर कपातीचे ऑनलाईन विवरणपत्र तयार करुन देणे. | वार्षिक | |
| नमुना २४ क्यु संदर्भातील वार्षिक विवरणपत्र (जोडपत्र-२) भरुन नमुना २७ ए उपलब्ध करुन देणे | | |
| मासिक जीएसटी रिटर्न फायलिंग करणे | | |
| चलन तयार करणे | | |

टिप :-१. प्रत्येक कामाचे दर हे अंक आणि अक्षरी नमुद करावेत. अंकी आणि अक्षरी दरामध्ये तफावत असल्यास अक्षरी नमुद केलेला दर विचारात घेतला जाईल.
२. सदरचे दर हे सर्व करासहित नमूद करावेत.

प्रमाणित करण्यात येते की, दर मागणी पत्रातील सर्व अटी व शर्ती मी/आम्ही काळजीपूर्वक वाचलेल्या असून त्या समजून घेतलेल्या आहेत. त्या सर्व अटी व शर्ती मला/आम्हास मान्य असून त्या अनुषंगाने दर भरलेले आहेत.

| | |
|---|---|
| दरपत्रक भरणा-याची स्वाक्षरी | ------------------------------------ |
| दरपत्रक भरणा-याचे नाव | ------------------------------------ |
| दरपत्रक भरणा-याचे पदनाम | ------------------------------------ |
| फर्म/कंपनी/संस्थेचे नाव | ------------------------------------ |